# प्रकरण २

# ऐतिहासिक माहितीचे संपादन

## (Acquisition of Historical Data)

इतिहासाचा संबंध हा भूतकाळाशी असतो. भूतकाळात जे-जे घडले ते-ते सर्वच्या सर्व इतिहासात अंतर्भूत होते. इतिहास म्हणजे काय? इतिहासाचे विविध अर्थ, इतिहासाच्या विविध व्याख्या म्हणजेच अनेक इतिहासतज्ज्ञांचा इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोण व त्यांची स्पष्टीकरणे याचा सविस्तर आढावा आपण पाठीमागील प्रकरणात घेतला आहे. इतिहास म्हणजे काय? हे सांगण्याचा व त्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न अनेक तज्ज्ञांनी आपापल्या दृष्टीने केला. इतिहासाची परिपूर्ण अशी एकही व्याख्या आपणास सांगता येत नाही. असे असले तरी यात एक सूत्र आपणास दिसते ते म्हणजे इतिहास म्हणजे "भूतकाळातील मानवाच्या सर्वांगीण प्रगतीचा, विकासाचा व परिवर्तनाचा आढावा होय." यातून इतिहासाचे स्वरूप व व्याप्ती स्पष्ट होते. त्याचेही विवेचन पाहिले आहे. इतिहासाचे त्याच्या स्वरूपानुसार विविध प्रकार कोणते? व इतिहासास साह्य करणारी शास्त्रे कोणती याचा आढावा घेतला आहे. इतिहासातील घटनांचे सत्यस्वरूप समजावून घेत असताना आपणास विविध साधनांवर अवलंबून राहावे लागते. साधनांच्या, पुराव्यांच्या आधाराशिवाय आपण वस्तुनिष्ठ व सत्य माहिती देऊच शकत नाही. म्हणून इतिहासलेखन प्रक्रियेत संदर्भ साधनांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. म्हणूनच म्हटले जाते, "संदर्भ साधनांशिवाय इतिहास लिहिणे अशक्य असते." काळाच्या ओघात इतिहासाचे स्वरूप बदलत आहे. त्याची व्याप्ती वाढत आहे. आधुनिक काळात इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलत आहे. परिणामी, इतिहासाच्या संदर्भ साधनांचे संकलन व संपादन करण्याच्या पद्धती बदलत आहेत. इतिहास हे एक सामाजिकशास्त्र आहे हे मान्य झाल्यामुळे वस्तुनिष्ठता व सत्यकथन या गोष्टी महत्त्वाच्या ठरल्या आहेत.

वरील विविध बाबींच्यामुळे परंपरागत इतिहासाच्या साधनांच्या वापराबरोबरच आधुनिक ऐतिहासिक साधनांचा वापर इतिहासलेखनासाठी आवश्यक ठरतो. म्हणूनच आपणास या प्रकरणात आधुनिक ऐतिहासिक साधनांची व ऐतिहासिक माहिती संपादित करण्याची आवश्यकता असते. त्यात लिखित, अलिखित साधनांचा अंतर्भाव होतो. या प्रकरणात आपण अशा प्रकारच्या विविध आधुनिक साधनांचा थोडक्यात आढावा घ्यावयाचा आहे. ती साधने पुढीलप्रमाणे –

Scanned by TapScanner

(अ) सर्वेक्षण, मुलाखत व प्रश्नावली

(ब) पुराभिलेखागार आणि वृत्तपत्रे

(क) आकाशवाणी, दूरचित्रवाणी, लघुपट व महाजाल.

या विविध ऐतिहासिक संदर्भ साधनांची थोडक्यात माहिती घेऊ.

## (अ) सर्वेक्षण, मुलाखत व प्रश्नावली (Survey, Interview & Questionnaire)

इतिहासाची संदर्भ साधने अनेक प्रकारांमध्ये विखुरलेली असतात. इतिहास संशोधकास त्याचे संकलन करावे लागते. आधुनिक संदर्भ साधनांमुळे संदर्भ साधनांचा स्रोत वाढला आहे. माहिती घेण्याचे तंत्रज्ञान विकसित झाले आहे. त्यामुळे वस्तुनिष्ठ व सत्य इतिहास कथनास चांगलेच साह्य झाले आहे. या घटकात सर्वेक्षण, मुलाखत व प्रश्नावली यांची माहिती घेणार आहोत.

**१. सर्वेक्षण (Survey) :** सर्वेक्षण म्हणजे आपल्या संशोधन विषयाच्या संदर्भात असणाऱ्या माहितीचे, साधनसामग्रीचे किंवा संदर्भ साधनांचे संशोधनाच्या दृष्टीने काळजीपूर्वक केलेले समग्र निरीक्षण होय असे म्हणणे योग्य ठरेल. इतिहासाचे समकालीन साधन म्हणून सर्वेक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आपल्या संशोधन विषयाच्या निगडित सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय, वाणिज्य, व्यापार, स्थापत्यशास्त्र, मूर्ती इत्यादींच्या बाबतीत इतिहासलेखन प्रक्रियेत सर्वेक्षण महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडते. इतिहास संशोधक हा माणूस आहे. त्या व्यक्तीस देश, धर्म, प्रदेश, वंश, वर्ण हा असतोच, त्यामुळे इतिहास संशोधनात वरील बाबींचा अभिनिवेश त्यांच्या लिखाणात उतरण्याची शक्यता असते म्हणजेच त्याच्या हातून व्यक्तिनिष्ठ (Subjective) लिखाण, संशोधन होण्याची शक्यता असते. म्हणून सर्वेक्षण करत असताना वस्तुनिष्ठता (Objectivity) सांभाळणे किंवा वास्तवाकडे पाहणे. वस्तुस्थितीचा अभ्यास करून सर्वेक्षण करणे आवश्यक असते. मूळ किंवा पूर्वी अस्तित्वात असलेल्या सर्वेक्षणाचे चिकित्सक परीक्षण व विश्लेषण करूनच संशोधकाने त्याचा स्वीकार करावा. सर्वेक्षणातून सांख्यिकीय संदर्भ देताना त्याचे आकडे, आलेख व तुलना योग्य असाव्यात. उदा. भारतात एखाद्या विशिष्ट प्रदेशात, विशिष्ट काळात स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा झालेला विकास, कृषीचा विकास किंवा आर्थिक विकास इत्यादी. ऐतिहासिक वस्तुस्थितींचे वस्तुनिष्ठ स्पष्टीकरण करण्यास अशी सर्वेक्षणे उपयोगी पडतात. संशोधनात मोलाची भर टाकतात. अशा प्रकारे संशोधकास सर्वेक्षण त्याच्या कार्यात मोलाचे साह्य करीत असले तरी सर्वेक्षण करत असताना त्याने पुढील काळजी घेणे आवश्यक ठरते.

Scanned by TapScanner

**सर्वेक्षण करताना घ्यावयाची काळजी**

१. संशोधकाने इतरांनी केलेल्या सर्वेक्षणावर अवलंबून न राहता स्वत: सर्वेक्षण करावे.

२. संशोधकास सर्वेक्षणातून जी माहिती मिळवणे अपेक्षित आहे त्याची अपेक्षा स्पष्ट शब्दात मांडावी.

३. संशोधन व सर्वेक्षण संदर्भातील संशोधकाचे हेतू स्पष्ट असावेत. त्यात संदिग्धता असू नये.

४. सर्वेक्षणासाठी तयार केलेली संशोधकाची प्रश्नावली ही स्पष्ट, नेमके प्रश्न असणारी व परिपूर्ण असावी.

५. सर्वेक्षणाचे मुद्दे साधे, सोपे, सरळ, स्पष्ट व मर्यादित असावेत. ते जर पाल्हाळीक, क्लिष्ट, अस्पष्ट असतील तर विचारलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे मिळणार नाहीत. परिणामी संशोधनात त्रुटी राहतील.

६. संशोधकाने शक्यतो स्वत:च सर्वेक्षण करावे. परंतु त्याच्यापूर्वी झालेल्या सर्वेक्षणांचा सुद्धा संदर्भ घेऊन तौलनिक निरीक्षण करून घ्यावे.

७. सर्वेक्षण सामूहिक व वैयक्तिक पातळीवर करावे. कारण दोन्हींचे निष्कर्ष हे भिन्न-भिन्न स्वरूपाचे असू शकतात.

८. संशोधन विषयाची व सर्वेक्षणाची व्याप्ती वाढवू नये. ती मर्यादित असावी. त्यामुळे नेमकी व वस्तुनिष्ठ माहिती मिळते.

९. सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीचे निरनिराळ्या प्रकारे विश्लेषण करावे. उदा. संख्याशास्त्रीय विश्लेषणातून जास्तीतजास्त वस्तुनिष्ठता स्पष्ट होते.

१०. सर्वेक्षणातून मिळालेली माहिती नवीन आहे का? सर्वेक्षणातून कोणत्या नवीन पैलूवर प्रकाश पडला हे स्पष्ट करावे.

११. सर्वेक्षणाच्या विश्लेषणावरच संशोधनाचे निष्कर्ष अवलंबून असतात. म्हणून सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीची अन्य साधनांबरोबर पडताळणी करून माहितीची सत्यता तपासून पाहावी.

**२. मुलाखत (Interview) :** समकालीन इतिहासांचे साधन म्हणून मुलाखत तंत्राला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. इतिहास संशोधनाच्या प्रक्रियेत मुलाखत पद्धत



Scanned by TapScanner

ही फक्त समकालीन इतिहासाच्या लेखनासाठीच वापरली जाते. मुलाखतीमुळे समकालीन घटना किंवा चळवळींमध्ये प्रत्यक्ष सहभागी झालेल्या व्यक्तीस समक्ष भेटून अधिक माहिती मिळविता येते. मुलाखतीमुळे त्या घटनेचे ऐतिहासिक स्वरूप स्पष्ट होते. व्यक्ती किंवा घटना किंवा चळवळीचे ऐतिहासिक चित्र उभे करण्यासाठी, त्या चित्राच्या निर्मितीसाठी या तंत्राचा महत्त्वाचा उपयोग होतो. मुलाखतीमध्ये मुलाखत घेणारा व मुलाखत देणारा या दोन व्यक्ती महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत असतात. कारण या दोघांच्या परस्पर संवादातूनच ऐतिहासिक माहिती मिळत असते. म्हणून मुलाखत घेणे हे एक तंत्र आहे हे लक्षात घेऊन ते तंत्र संशोधकाने आत्मसात करावे. त्यासाठी संशोधकास त्या विषयाचे सखोल ज्ञान असावे लागते. मुलाखत घेण्यापूर्वी संशोधकाने मुलाखतीचे स्वरूप व व्याप्ती ठरविणे अत्यावश्यक असते. तरच तो आपल्या मुलाखतीचा हेतू साध्य करू शकतो. संशोधकाने मुलाखत घेण्यापूर्वी पूर्वतयारी करणे आवश्यक ठरते. त्यात मुलाखत एका व्यक्तीची घ्यावयाची आहे का अनेक? अनेक लोकांची घ्यावयाची असल्यास त्यांच्या दर्जानुसार, ज्ञानानुसार व अनुभवानुसार त्यांची क्रमवारी ठरविणे आवश्यक असते. मुलाखतीमधून कोणत्या प्रकारची माहिती आपण मिळविणार आहोत, हे निश्चित करावे लागते. मुलाखत देणाऱ्याकडून मिळालेल्या माहितीचे संकलन करून ठेवावे. या मुलाखत तंत्राचे दोन प्रकार पडतात. (अ) आकारिक मुलाखत (Structural Interview) (ब) मुक्त मुलाखत (Unstructured Interview)

***(अ) आकारिक मुलाखत (Structural Interview) :*** या मुलाखतीत पूर्वनियोजित साचेबंद व नेमके प्रश्न विचारले जातात. त्यामुळे मुलाखत देणाऱ्याकडून नेमकी, अचूक व साचेबंद उत्तरे आपणास मिळतात. परंतु काही वेळा मुलाखत देणारा वेगळ्या स्वरूपाची उत्तरे देतो, पर्यायी उत्तरे देतो तेव्हा संशोधकाने ती उत्तरे जशीच्या तशी लिहून घ्यावीत. काही वेळा मुलाखत देणारा एखाद्या प्रश्नाचे उत्तर देत नसेल तर त्याचा आग्रह धरू नये. या मुलाखतीत जे प्रश्न विचारले जातात त्यांची उत्तरे 'होय' किंवा 'नाही' या स्वरूपाची असतात.

***(ब) मुक्त मुलाखत (Unstructured Intreview) :*** या प्रकारात कोणतेही पूर्वनियोजन न करताच प्रश्न विचारले जातात. या पद्धतीत मुलाखत घेणारा मुलाखत देणाऱ्यापुढे आपल्या संशोधनाचा विषय मांडतो. आपल्या विषयाची व त्या संदर्भातील अनेक तपशिलांची माहिती तो मुलाखत देणाऱ्यास देतो. आपल्या मुलाखतीचा हेतू स्पष्ट करतो. अशा प्रकारच्या मुलाखतीमध्ये प्रश्न व उत्तर यांच्यात प्रमाणबद्धता नसते. मुलाखत घेणारा कोणतेही प्रश्न केव्हाही विचारू शकतो. परिणामी, त्यास अपेक्षित असणारे

Scanned by TapScanner

साचेबंद उत्तर मिळेलच असे नाही. मुलाखत देणाऱ्यावर उत्तर देण्याचे बंधन आपण घालू शकत नाही. अशा वेळी अन्य प्रश्नातून मुलाखत देणाऱ्याकडून अत्यंत चाणाक्षपणे व खुबीने उत्तर काढून घेण्याची क्षमता संशोधकाकडे हवी.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये सहभागी झालेल्या स्वातंत्र्ययोद्ध्यांच्या मुलाखतींमधून इतिहास संशोधकास आवश्यक ती महत्त्वाची माहिती मिळू शकते. फक्त त्याची विश्वासार्हता अन्य साधनांद्वारे तपासून घ्यावी लागते. तरच वस्तुनिष्ठ व सत्य संशोधन होते.

## मुलाखत घेताना घ्यावयाची काळजी

१. ज्या व्यक्तीची मुलाखत घ्यावयाची आहे त्यांची सर्व माहिती, नाव, गाव, शिक्षण व वय यांची माहिती संशोधकास हवी. त्याचा सामाजिक दर्जा व व्यक्तिमत्त्वाची पूर्ण माहिती असावी.

२. मुलाखत घाईगडबडीत घेऊ नये. त्यासाठी पूर्वनियोजन करून काळ, वेळ व ठिकाण ठरलेले असावे. तसेच मुलाखत ही मुलाखत देणाऱ्या व्यक्तीच्या सोईने व त्या व्यक्तीच्या सोईच्या ठिकाणी घ्यावी.

३. मुलाखतीत होणाऱ्या संवादात अडथळा येणार नाही याची काळजी घ्यावी.

४. मुलाखतीत विचारले जाणारे प्रश्न हे साधे, सोपे, सरळ, मुद्देसूद असावेत. त्यामुळे मुलाखतीत अडथळा येत नाही.

५. मुलाखत देणाऱ्याचा अवमान होईल, त्याचा अहंकार दुखावला जाईल असे प्रश्न विचारू नयेत.

६. मुलाखत घेणाऱ्याकडे प्रचंड चिकाटी व जिद्द असावी. यासाठी तसेच त्याच्याकडे सहनशीलता व शांतता असणे आवश्यक आहे.

७. मुलाखत घेणाऱ्याने त्याच्या संशोधनानुसार प्रश्नांची क्रमवारी लावून घ्यावी. आपल्या प्रश्नातून मुलाखत देणारा आनंदी व समाधानी व्हावा. तो जास्तीतजास्त बोलता होऊन त्याने सत्यकथन करावे, असे प्रश्न असावेत.

८. मुलाखत ध्वनिमुद्रित करून घ्यावी. कारण घेतलेल्या मुलाखतीचा पुरावा संशोधकाकडे असावा. परिणामी, भविष्यातही वाद व मतभेद टाळणे सोपे होते.

९. मुलाखत घेताना ती घेणाऱ्याने पूर्वग्रहदूषित असू नये. त्याने लवचीक राहावे.

Scanned by TapScanner

### मुलाखतीचे फायदे

१. मुलाखतीच्या आधारे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांचा व संदर्भ साधनांचा योग्य पद्धतीने अन्वयार्थ लावता येतो.

२. आपल्या विषयासंबंधी कागदपत्रांतून न मिळालेली जादा माहिती मिळते.

३. मुलाखतीमुळे विषयाच्या संदर्भात पूरक व संबंधित माहिती मिळते.

४. मुलाखतीमुळे मुलाखत घेणारा व मुलाखत देणारा यांच्यात स्नेहाचे संबंध प्रस्थापित होतात.

५. मुलाखतीमुळे एकमेकांविषयीचा पूर्वग्रह नाहीसा होतो.

### मुलाखतीचे तोटे

१. मुलाखत घेणारा व देणारा यांना काही मर्यादा आहेत, त्यामुळे संशोधकास मर्यादितच उत्तरे मिळतात किंवा विषयाशी संबंधित नसणारी उत्तरे मिळतात.

२. मुलाखत देणारी व्यक्ती वृद्ध असेल तर त्याचे काही प्रमाणात विस्मरण झालेले असते. तेथे त्रुटी राहते किंवा खोटी माहिती दिली जाते.

३. मुत्सद्दी राजकारणी व्यक्ती मुलाखतीत दिशाभूल करण्याची शक्यता असते.

४. मुलाखतीसाठी खूप श्रम करावे लागतात. खूप वेळ द्यावा लागतो. तसेच पैसाही खर्च होतो.

५. सर्वच संशोधकांना मुलाखतीचे कौशल्य आत्मसात करता येत नाही. परिणामी संशोधनात त्रुटी व अपुरेपणा राहण्याचा संभव असतो.

**३. प्रश्नावली (Questionnaire) :** समकालीन इतिहास संशोधनामध्ये प्रश्नावलीस महत्त्वाचे स्थान आहे. समकालीन ऐतिहासिक माहिती व संदर्भ समजून घेण्यासाठी, या माहितीचे एकत्रित संकलन करण्यासाठी प्रश्नावलीचा उपयोग होतो. इतिहास संशोधनासाठी जे सर्वेक्षण संशोधक करतो त्या बाबतीतसुद्धा प्रश्नावलीचा उपयोग होतो. तसेच मुलाखतसुद्धा प्रश्नावलीच्या साह्यानेच घेतली जाते. अशा प्रकारे संशोधनात प्रश्नावली अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडते. मुलाखत व सर्वेक्षणामध्ये पूरक म्हणून प्रश्नावलीचा उपयोग होतोच. परंतु समकालीन इतिहास संशोधनात प्रश्नावलीच्या साह्याने स्वतंत्रपणे संशोधन करता येते. सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय स्वरूपाच्या संशोधनात प्रश्नावली पद्धतीचा स्वतंत्रपणे वापर केला जातो. शंभर वर्षांच्या आतील ऐतिहासिक घटना व चळवळी यांचा अभ्यास करण्यासाठी, त्यांचे संशोधन करण्यासाठी प्रश्नावलीचा

Scanned by TapScanner

उपयोग होतो. उदा. पश्चिम महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळ व त्यातून उदयास आलेले 'प्रतिसरकार' (Parellel Government) 'प्रतिसरकार'च्या चळवळीचा इतिहास. कारण ही चळवळ प्रत्यक्ष पाहिलेले लोक तसेच चळवळीत सहभागी झालेले लोक आजही उपलब्ध होऊ शकतात. हे लोक या इतिहासाचे साक्षीदार आहेत. अशा लोकांकडून प्रश्नावलीमार्फत समकालीन व सत्य इतिहास जाणून घेता येतो. भूतकाळातील इतिहासाची माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावलीचा उपयोग होतोच; पण राजकीय व आर्थिक सर्वेक्षणात भविष्यातील अंदाज बांधण्यासाठीसुद्धा प्रश्नावलीचा उपयोग होतो. उदा. निवडणूक काळातील मतदारांचा कौल जाणून घेणे, आर्थिक क्षेत्रातील उत्पादनाविषयी धोरण निश्चित करण्यासाठी इत्यादी बाबींसाठी या पद्धतीचा उपयोग करून घेता येतो.

## प्रश्नावलीचे स्वरूप व व्याप्ती

उत्तम प्रश्नावली तयार करणे हे एक कौशल्य आहे. संशोधकास जी माहिती हवी आहे ती नेमकी वस्तुनिष्ठ व सत्य माहिती मिळविण्यासाठी उत्तम प्रश्नावली तयार करणे हे अपेक्षित आहे. उत्तर देणाऱ्यास विविध प्रश्न विचारून आपणास हवी ती माहिती मिळविणे ही बाब वाटते तेवढी सोपी नाही. म्हणून प्रश्नावलीकर्त्याने आपले सर्व ज्ञान, कौशल्य व अभ्यास पणास लावून त्यावर चिंतन करून प्रश्नावलीची निर्मिती करावी. त्यासाठी संशोधकाने पुढील काळजी घेणे आवश्यक ठरते.

१. ज्या व्यक्तीस आपण प्रश्नावली देणार आहोत ती विश्वासू व जबाबदार असावी.

२. इतिहास हे एक शास्त्र आहे, याची जाणीव ठेवून प्रश्नावलीतील प्रश्न विचारावेत.

३. संशोधकाने आपल्या विषयाचे स्वरूप व व्याप्ती लक्षात घेऊन प्रश्न विचारावेत.

४. प्रश्न हे नेमके, साधे, सरळ, सुटसुटीत, सोपे व स्पष्ट असावेत.

५. आवश्यकता आहे तेवढेच प्रश्न विचारावेत. प्रश्नांची संख्या व लांबी वाढणार नाही याची काळजी घ्यावी.

६. एका प्रश्नातून दुसरा प्रश्न व त्यातून तिसरा प्रश्न निर्माण होईल असे असावेत.

७. प्रश्न हे वास्तव, वस्तुनिष्ठता व सत्य माहिती मिळेल असे असावेत.

८. प्रश्नांची क्रमवारी कालानुक्रमे किंवा घटनाक्रमाने तसेच सुसंगत असावी.

९. आपले प्रश्न उत्तरदात्याचा अवमान होईल, अहंकार दुखावेल असे असू नयेत.

१०. प्रश्नांच्या उत्तराला पर्याय द्यावेत व उत्तर देणाऱ्यास पसंतीच्या उत्तरास बरोबर अशी खूण करण्याची विनंती करावी.

Scanned by TapScanner

११. प्रश्नावलीत संशोधक व्यक्ती, संशोधनाचा विषय व त्याचा हेतू याची माहिती दिलेली असावी.

१२. प्रश्नावली भरून देण्याच्या संदर्भात केलेले आवाहन नम्र व प्रभावी असावे.

१३. प्रश्नावलीसाठी वापरलेला कागद उत्तम दर्जाचा असावा, छपाई आकर्षक असावी.

१४. प्रश्नावली ज्यांना पाठवणार आहोत त्या व्यक्ती व संस्था यांची माहिती घेऊन विचारपूर्वक योग्य त्या व्यक्ती अगर संस्थेकडे ती पाठवावी.

**प्रश्नावलीचे फायदे**

१. योग्य असणाऱ्या व्यक्ती व संस्थांकडे प्रश्नावली पाठवल्यामुळे आवश्यक व योग्य माहितीचे संकलन होते.

२. या पद्धतीमुळे कमी वेळात अनेक लोकांकडून जास्तीतजास्त माहिती मिळते.

३. प्रश्नावलीत पर्यायी उत्तरे दिल्यामुळे तुम्हास अपेक्षित व सत्य उत्तरे मिळतात.

४. प्रश्न हे साधे, सुटसुटीत व नेमके विचारल्यामुळे नेमकी, वस्तुनिष्ठ व आवश्यक ती माहिती मिळते.

५. संशोधकास अपेक्षित व अभिप्रेत नसलेली पण विषयाला उपयुक्त माहिती एखाद्या प्रश्नाच्या उत्तरातून मिळू शकते. त्यामुळे संशोधनास मदत करणारे व पुष्टी देणारे संदर्भ अभ्यासता येतात.

६. प्रश्नावलीतील माहितीवरून संशोधनाची दिशा निश्चित करण्यास मदत होते.

वरीलप्रमाणे प्रश्नावली पद्धतीचा वापर करून जी माहिती मिळते त्या माहितीची सुसंगती लावून त्या माहितीचे विश्लेषण करावे लागते. त्या शास्त्रशुद्ध व तर्कसंगत केलेल्या विश्लेषणातून संशोधन विषयास आवश्यक असणारी माहिती मिळते. अशा प्रकारे प्रश्नावलीच्या साह्याने संशोधनास मदत होते.

## (ब) पुराभिलेखागार आणि वृत्तपत्रे (Archives and Newspapers)

इतिहासलेखन प्रक्रियेत संशोधन विषयासाठी संदर्भ साधनांचा शोध घ्यावा लागतो. आपल्या विषयाच्या संदर्भात प्रथम दर्जाची म्हणजेच अव्वल दर्जाची व दुय्यम दर्जाची साधने कोणत्या ठिकाणी मिळतील याचा प्रथम अभ्यास करावा लागतो. विषयाच्या संदर्भात लिखित व अलिखित साधनांचे संकलन करावे लागते. ही ऐतिहासिक साधने विविध ठिकाणी विखुरलेली असतात. त्यासाठी संशोधकास काळ, वेळ, श्रम व पैसा

Scanned by TapScanner

खर्च करून फिरावे लागते. एखादे संदर्भ साधन किंवा कागदपत्र उपलब्ध झाल्यास त्याची विश्वासार्हता पडताळून पाहाण्यासाठी दुसऱ्या साधनांचा आधार घ्यावा लागतो. अशा संदर्भ साधनांचा शोध 'पुराभिलेखागार' व भूतकालीन वृत्तपत्रे यांच्या माध्यमातून घ्यावा लागतो. त्यांची थोडक्यात माहिती आपण येथे घेणार आहोत.

## १. पुराभिलेखागार / आर्काइव्ह (Archives)

साधारणपणे पुराभिलेखागार म्हणजे पुरातन, हाताने लिहिलेले लिखाण किंवा हस्वलिखिते जेथे ठेवली जातात ते ठिकाण किंवा स्थान. पुराभिलेखागाराचा अर्थ त्या शब्दांतच दडलेला आहे; पुरा म्हणजे प्राचीन किंवा जुने; अभिलेख म्हणजे दस्तऐवज किंवा कागदपत्र; आगार म्हणजे ठेवण्याचे ठिकाण किंवा साठवणुकीची जागा. याचा एकत्रित शब्द तयार होतो तो 'पुराभिलेखागार' होय. त्यालाच इंग्रजीमध्ये 'आर्काइव्ह' (Archives) किंवा रेकॉर्ड ऑफिस (Record Office) असे म्हणतात. म्हणजेच ऐतिहासिक कागदपत्रे, दस्तऐवज अगर वस्तू यांचा जेथे संग्रह केला जातो अशा शासकीय इमारतीस पुराभिलेखागार, आर्काइव्ह, रेकॉर्ड ऑफिस किंवा दप्तरखाना असे म्हणतात. आर्काइव्हमध्ये प्रथम दर्जाच्या सरकारी कागदपत्रांचा संग्रह केलेला असतो. म्हणून आर्काइव्हमध्ये इतिहास संशोधनासाठी अस्सल व अव्वल दर्जाची संदर्भ साधने मिळतात. येथील कागदपत्रे ही अप्रकाशित असतात, त्यामुळे इतिहासावर नवा प्रकाश टाकला जातो. आर्काइव्हमधील कागदपत्रे किंवा अभिलेख हे प्रसिद्ध स्वरूपाचे लिखित दस्तऐवज असतात. त्याचा उपयोग सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय इतिहासाची मांडणी अगर पुनर्मांडणी करण्यासाठी केला जातो.

कागदाचा शोध लागण्यापूर्वी शालवृक्षाच्या सालीपासून बनलेले 'तालपत्र' किंवा 'ताडपत्र' वापरत असत. ही तालपत्रे तयार करण्याची प्रक्रिया ही मोठ्या कष्टाची व चिकाटीची होती. तरीसुद्धा तालपत्राचा उपयोग लिहिण्यासाठी केल्याचे स्पष्ट होते. ती हस्तलिखित प्रत लेखकांची पुढची पिढी अत्यंत श्रद्धेने जतन करत. हे टिकवून ठेवण्याचे जिकिरीचे व जिद्दीचे कार्य झाल्याचे दिसते. याप्रमाणेच भूर्जपत्रे, चर्मपत्रे व ताम्रपट तयार करून त्यावर प्राचीन काळात लिखाण झाल्याचे दिसते.

प्रथम कागदाचा व नंतर अलीकडील काळात छापखान्याचा शोध लागल्यानंतर लिखाणाचे स्वरूप बदलले. आजपर्यंत जे ज्ञान बंदिस्त व ठरावीक लोकांपुरते मर्यादित होते त्या ज्ञानाचे सार्वत्रीकरण सुरू झाले. ही ज्ञानाच्या सार्वत्रीकरणाची प्रक्रिया युरोपात १५ व १६ व्या शतकात झाली व भारतात ती ३०० ते ३५० वर्षांनंतर म्हणजे १९ व्या शतकात सुरू झाली. भारतात प्राचीन काळातील, मध्ययुगीन काळातील हस्तलिखिते

Scanned by TapScanner

मिळाली आहेत. उदा. 'कौटिल्याचे अर्थशास्त्र', 'सातवाहनकालीन गाथासप्तशती', चक्रधरस्वामींचे 'लीळा चरित्र' तसेच अनेक प्राचीन धर्मग्रंथ, वेद, उपनिषद, ब्राह्मण्ये, आरण्यके, दीपवंश, महावंश इत्यादी पुराभिलेखीय पुरावे आहेत. तसेच इ. स. ६ व्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंत जे अनेक धार्मिक ग्रंथ लिहिले गेले, ते पुराभिलेखीय पुरावेच आहेत. उदा. शैव, वैष्णव, शाक्त, नाथ, महानुभाव इत्यादी पंथ तसेच जैन व बौद्धधर्मीय ग्रंथ इत्यादी.

याशिवाय प्राचीन व मध्ययुगीन काळातील चरित्र ग्रंथ, विशाखादत्ताचे बुद्धचरित्र, बाणभट्टाचे हर्षचरित्र, बाबरनामा, परमानंदाचे शिवभारत इत्यादी प्राचीन व मध्ययुगातील परकीय प्रवाशांची प्रवासवर्णने, चिनी बौद्ध भिक्षूक फाहियान, ह्यु-एन-त्संग व इत्सिंग यांची भारतातील राजकीय, सामाजिक व धार्मिक माहिती देणारी प्रवासवर्णने, युरोपियन प्रवाशांची प्रवासवर्णने, प्राचीन नाटके, धार्मिक वाङ्मय, बखरी इत्यादी ग्रंथ व दस्तऐवज हे आर्काइव्हमध्ये सुरक्षित व काळजीपूर्वक जतन करून ठेवले जातात.

महाराष्ट्रात पुराभिलेखागारांची (आर्काइव्हची) निर्मिती ही १९ व्या शतकाच्या प्रारंभी झाली. या काळात सर्व भारतभर इंग्रजी सत्तेचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते. १७ व्या शतकापासून मुंबई शहर इंग्रजांच्या कारभाराचे मुख्य केंद्र होते. त्यामुळे ब्रिटिश ईस्ट इंडियाच्या काळातील राज्यकारभार, मुलकी प्रशासन, लष्करी प्रशासन, परराष्ट्र व्यवहारासंबंधीची कागदपत्रे मुंबई येथील रेकॉर्ड ऑफिसमध्ये (आर्काइव्ह) सुसंगतवार ठेवलेली आहेत. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर महाराष्ट्रात पुढील महत्त्वाच्या ठिकाणी आर्काइव्हची निर्मिती केली व त्या प्रदेशातील पुराभिलेखीय दस्तऐवज व मौलिक प्राचीन ग्रंथ तसेच महत्त्वाचे ऐतिहासिक संदर्भ साधनांची साठवणूक केली. अशी आर्काइव्हज पुढीलप्रमाणे –

१. **मुंबई पुराभिलेखागार :** मराठ्यांच्या इतिहासाची कागदपत्रे, ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटिश शासनाची कागदपत्रे, स्वातंत्र्य चळवळीच्या काळातील कागदपत्रे येथे मिळतात.

२. **पुणे पुराभिलेखागार :** मराठ्यांची विशेषतः पेशवाईतील कागदपत्रे.

३. **नागपूर पुराभिलेखागार :** नागपूरकर भोसले व गोंड राजा संबंधीची कागदपत्रे.

४. **औरंगाबाद :** निजामकालीन दस्तऐवज, रझाकार चळवळ कागदपत्रे.

५. **कोल्हापूर :** कोल्हापूर संस्थानाशी संबंधित दस्तऐवज.

Scanned by TapScanner

याशिवाय भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे. वि. का. राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, धुळे इत्यादी ठिकाणी आर्काइव्हज आहेत.

भारताचे राष्ट्रीय पुराभिलेखागार नवी दिल्ली येथे आहे. तसेच भारतातील प्रत्येक राज्याच्या राजधानीत पुराभिलेखागार आहेत. उदा. मुंबई, मद्रास, कोलकता, हैद्राबाद, त्रिवेंद्रम इत्यादी ठिकाणी.

**आर्काइव्हजची वैशिष्ट्ये**

१. सरकारच्या विविध खात्यांमधील महत्त्वाची कागदपत्रे येथे सुरक्षितपणे ठेवली जातात.

२. सरकारी कागदपत्रे नि:पक्षपाती असतात. त्यांचा वापर इतिहास संशोधकांनी करावा अशी अपेक्षा असते.

३. आर्काइव्हजमधील या कागदपत्रांचा उपयोग संशोधनाशिवाय सरकारी अधिकारी, शासनाचा धोरणात्मक निर्णय ठरविण्यासाठी त्याचा अभ्यास करतात.

४. आर्काइव्हजमधील दस्तऐवज व कागदपत्रे यांची रजिस्टरमध्ये नोंद केलेली असते व विशिष्ट क्रमाने रूमाल बांधून ठेवलेली असतात.

५. आर्काइव्हजमध्ये मूळ लिखित पुरावे, दस्तऐवज व कागदपत्रे जतन करून ठेवतात.

६. येथील कागदपत्रांमुळे मानवी संस्कृतीचे वारसा व परंपरांचे जतन केले जाते.

७. मानवाच्या झालेल्या सर्वांगीण प्रगतीचा, विकासाचा, परिवर्तनाचा इतिहासावर येथील कागदपत्रे नवा प्रकाश टाकतात.

म्हणूनच पुराभिलेखागार/आर्काइव्हज हा प्रत्येक देशाचा, त्याच्या संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे. म्हणून त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

**२. वृत्तपत्रे (Newspapers)**

१५ व्या–१६ व्या शतकात युरोपात प्रबोधन युगाचा उदय झाला. सांस्कृतिक परंपरा, चालीरीती व रूढीरिवाज आणि परंपरागत धार्मिक रूढी व आज्ञा यांचा विचार बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टीने होऊ लागला. त्यातून तेथे औद्योगिक क्रांतीचा उदय झाला. अनेक नवे शोध लागले. औद्योगिक क्रांतीच्या विकासाने, प्रगतीने गती घेतली. या शोधांपैकीच 'मुद्रण' कलेचा शोध होय. युरोपात औद्योगिकीकरणाबरोबरच मुद्रण व्यवसायाचीसुद्धा प्रगती झाली. शेकडो ग्रंथांची छपाई मुद्रणालयातून छापखान्यातून सुरू

Scanned by TapScanner

झाली. इ. स. १४९८ मध्ये पोर्तुगीज धाडसी खलाशी वास्को-द-गामा भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर कालीकत या बंदरात येऊन पोहोचला. गोव्यात पोर्तुगिजांचे राज्य प्रस्थापित झाले. पोर्तुगिजांनी इ. स. १५५६ मध्ये गोव्यात पहिला छापखाना सुरू केला. १७ व १८ व्या शतकात भारतात जवळजवळ सर्व प्रमुख शहरांत व भारतातील सर्व प्रादेशिक भाषांत छापखाने सुरू झाले. यातूनच भारतात वृत्तपत्रांचा उदय झाला.

**वृत्तपत्रांचा उदय :** माणसाकडे कुतूहल किंवा आजूबाजूची परिस्थिती जाणून घ्यायची प्रवृत्ती ही उपजतच आहे. त्याच्या या चौकसबुद्धी व निरीक्षणवृती यातून वृत्तपत्राचा उदय झाला. पूर्वी दवंडी देणे, घंटा वाजवणे, कर्णे वाजवणे इत्यादी युद्ध अगर इतर संकटांची बातमी दिली जात असे. 'बातमी' देण्याचे एक प्रभावी साधन म्हणून वृत्तपत्राचा वापर सुरू झाला. चहूबाजूंनी, चारही दिशांतून येणाऱ्या वृत्तास 'बातमी' म्हणत. बातमीस इंग्रजीत शब्द (News) आहे. या News शब्दात - North - उत्तर, East - पूर्व, West - पश्चिम व South - दक्षिण या दिशांचा अंतर्भाव झालेला आहे. वृत्तपत्रांना 'लोकशाही शासनयंत्रणेचा चौथा स्तंभ' मानले जाते. वृत्तपत्रातील बातम्या सत्यघटनेवर आधारित असतात. वृत्तपत्रातून ज्ञानाचा प्रसार व प्रचार केला जातो. मानवी नैतिक मूल्यांचे जतन व संवर्धन केले जाते. थोडक्यात, वृत्तपत्र हे समाजजीवनाचा आरसा असते आणि म्हणूनच वृत्तपत्र हे इतिहासाचे एक महत्त्वपूर्ण साधन मानले जाते. आज हे वृत्तपत्र सर्वदूर ग्रामीण भागात वाडी-वस्तीवर पोहोचले आहे.

प्राचीन व मध्ययुगीन काळात वृत्तपत्रे नव्हती. ती आधुनिक युगात म्हणजे साधारण २०० ते २५० वर्षांपूर्वी उदयास आली. त्यामुळे गेल्या दोन-अडीचशे वर्षांचा इतिहास समजावून घेण्यासाठी 'वृत्तपत्र' हे अत्यंत विश्वसनीय व महत्त्वाचे इतिहासाचे संदर्भ साधन ठरते. तो एक महत्त्वाचा ऐतिहासिक दस्तऐवज व पुरावा आहे. असे असले तरी तो पुरावा शंभर टक्के खरा आहे असे इतिहास संशोधकाने मानण्याचे कारण नाही. कारण ती माहिती इतर साधनांद्वारे पडताळून पाहावी लागते. त्या बातमीचे तर्कशुद्ध विश्लेषण करूनच ती संशोधकास स्वीकारावी लागते.

## वृत्तपत्रांचे कार्य

वृत्तपत्रांचे प्रमुख उद्देश पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१. दैनंदिन घडामोडींची सत्य माहिती घेऊन त्या वृत्तपत्रात छापणे.

२. समाजातील दुर्बल घटकांची बाजू घेऊन त्यांना शक्ती देणे व त्यांच्यावरील अन्यायाचे निराकरण करणे.

Scanned by TapScanner

३. समाजातील विघातक, वाईट, अयोग्य व अन्यायी घटकांचा व त्यांच्याकडून घडलेल्या अन्यायी घटनांचा निषेध करून त्यांना विरोध करणे.

४. लोकांचे सर्व पातळ्यांवर प्रबोधन करणे.

५. लोकशिक्षण घडवून आणून लोकजागृती करणे.

६. लोकशाही शासनयंत्रणेत लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून काम करणे.

वरीलप्रमाणे उद्देश ठेवून स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील वृत्तपत्रांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. महाराष्ट्रात ६ जानेवारी, १८३२ रोजी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी मुंबईत 'दर्पण' वृत्तपत्र इंग्रजी व मराठी भाषेत प्रसिद्ध केले. त्यांनी परंपरागत भारतीय समाजाचे प्रबोधन उत्तम पद्धतीने केले. 'दर्पण' या वृत्तपत्राने मराठी वृत्तपत्राचा पाया घातला. म्हणून आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना मराठी वृत्तपत्राचे जनक म्हटले जाते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात लोकमान्य टिळकांच्या 'केसरी' व 'मराठा' वृत्तपत्राने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. म्हणूनच आज 'केसरी व मराठा' या वृत्तपत्रांचे त्या काळातील अंक हे स्वातंत्र्य चळवळीच्या अभ्यासासाठी महत्त्वाचे ऐतिहासिक साधन मानले जाते. लोकमान्य टिळकांनी आपल्या वृत्तपत्रात प्रखर देशाभिमानी लिखाण करून भारतीय समाजाचे स्वत्व जागे केले. समाजात प्रचंड जागृती घडवून आणली म्हणूनच त्यांना ब्रिटिश 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हणत असत. त्याच काळात लोकमान्य टिळकांचे मित्र पण वैचारिक विरोधक गोपाळ गणेश आगरकर यांनी 'सुधारक' वृत्तपत्र सुरू केले. त्यांनी समाजसुधारणांचे व प्रबोधनाचे काम आपल्या वृत्तपत्रातून केले. स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक वृत्तपत्रांनी समाजप्रबोधनाचे कार्य मोठ्या प्रमाणात केले. भारतीय बहुजन समाज जसा जागृत होऊ लागला, शिक्षण घेऊ लागला त्यातून अनेक ब्राह्मणेतर वृत्तपत्रे सुरू झाली. उदा. 'दीनबंधू', 'दीनमित्र', 'सत्यप्रकाश', 'विजयी मराठा', 'मूकनायक' इत्यादी. या वृत्तपत्रांनी खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक समाजप्रबोधनाचे कार्य केले. ब्राह्मणेतर चळवळीस बळ दिले. या समाजसुधारणेच्या इतिहासात ही वृत्तपत्रे व त्यांचे त्या काळातील अंक हा इतिहासाच्या संदर्भ साधनांचा अमूल्य ठेवा आहे. अशा प्रकारे 'वृत्तपत्रे' हे इतिहासाचे महत्त्वपूर्ण साधन आहे.

### (क) आकाशवाणी, दूरचित्रवाणी, लघुपट व महाजाल

**(Radio, T.V., Short Films & Internet)**

आधुनिक कालखंडात प्रसारमाध्यमांचे प्रामुख्याने तीन प्रकार पडतात ते म्हणजे मुद्रित माध्यमे, इलेक्ट्रॉनिक माध्यमे व नवमाध्यमे. मुद्रित माध्यमांत वृत्तपत्रे, नियतकालिके

Scanned by TapScanner

व ग्रंथसंपदा यांचा समावेश होतो. इलेक्ट्रॉनिक माध्यमामध्ये नभोवाणी म्हणजेच आकाशवाणी (रेडिओ) व दूरचित्रवाणी (टेलिव्हिजन) तर नवमाध्यमांमध्ये संगणक व इंटरनेट यांचा समावेश होतो. मुद्रित माध्यमाशिवाय बाकीची जी सर्व माध्यमे आहेत त्यांना इलेक्ट्रॉनिक माध्यमे म्हणूनच ओळखले जाते. आतापर्यंत आपण ऐतिहासिक संदर्भ साधनांचे संकलन व संपादनामध्ये सर्वेक्षण, मुलाखत, प्रश्नावली, आर्काइव्हज व वृत्तपत्रे यांचा इतिहासलेखन प्रक्रियेत कसा उपयोग होतो याचा थोडक्यात आढावा घेतला आहे. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात व २१ व्या शतकात माहिती व तंत्रज्ञानाचा जो झपाट्याने विकास झाला, त्यालाच माहिती तंत्रज्ञानाचा विस्फोट म्हणतात. यात जी नवीन इलेक्ट्रॉनिक माध्यमे येऊन विस्तारली आहेत त्यांचा ऐतिहासिक संदर्भ साधने व माहिती म्हणून कसा उपयोग होऊ शकतो किंवा होत आहे याची संक्षिप्त रूपाने माहिती घेऊ.

## १. नभोवाणी/आकाशवाणी (Radio)

आकाशवाणी हे वृत्तपत्राइतकेच महत्त्वाचे प्रसारमाध्यम आहे. आकाशवाणीवरील बातम्या, वृत्तविशेष व घटनांचे समालोचन ही सर्व समाजाच्या मनोरंजनाची, लोकजागृतीची व समाज प्रबोधनाची साधने आहेत. हवेतील तरंगामार्फत ध्वनी संदेश एका ठिकाणाहून दुसरीकडे पाठवण्याचा शोध मार्कोनी या अमेरिकन शास्त्रज्ञाने लावला व रेडिओच्या क्षेत्रात क्रांती झाली. इ. स. १९२० मध्ये सर्वांत प्रथम रेडिओ केंद्र अमेरिकेत निर्माण झाले. त्यानंतर दोनच वर्षांत इ. स. १९२२ मध्ये इंग्लंडमध्ये 'ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कार्पोरेशन' (बी.बी.सी.) ची सुरुवात झाली. आज जवळजवळ शंभर वर्षे बी.बी.सी.ने फार मोठी किंमत मोजून आपली विश्वासार्हता जपली आहे. सर्व जगभर बी.बी.सी.च्या सत्य व वस्तुनिष्ठ कथनाचा दबदबा आहे.

भारतात आकाशवाणी प्रसारणांचा प्रारंभ २३ जुलै, १९२७ रोजी झाला व पहिले नभोवाणी केंद्र मुंबई येथे त्याच दिवशी सुरू झाले. ते इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनी (आय.बी.सी.) ने केले. पण पुढे १९३७ मध्ये त्याचे रूपांतर 'ऑल इंडिया रेडिओ' (ए.आय.आर.) मध्ये झाले. तर पुढे स्वातंत्र्यानंतर १९५७ मध्ये भारत सरकारच्या माहिती व प्रसारण खात्यामार्फत 'प्रसारभारती' या स्वायत्त महामंडळाची स्थापना करून आकाशवाणी व दूरचित्रवाणीचे काम सुरू झाले. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हे आकाशवाणीचे ब्रीदवाक्य आहे. या आकाशवाणीमार्फत 'विविध भारती' व 'प्रसार भारती' या सेवा सुरू करण्यात आल्या. आकाशवाणी हे देशातील सर्व लोकांपर्यंत जाऊन पोहोचणारे महत्त्वाचे माध्यम आहे. त्यावरून बातमीपत्र, प्रबोधनपर वृत्ते, कृषी,

Scanned by TapScanner

किसान कन्या - 1937 . प्रथम रंगीन चित्रपट
1931 - आलम आरा - प्रथम बोलपट.



आरोग्य, रोजगार, शिक्षण, क्रीडा इत्यादी कार्यक्रम प्रसारित केले जातात. आकाशवाणी केंद्राकडे मुलाखती, चर्चा, संवाद, भाषणे इत्यादींचा ध्वनिमुद्रित संग्रह आहे.

राष्ट्रीय महापुरुष महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार पटेल, सुभाषचंद्र बोस इत्यादी, तसेच थोर संगीतकार, गायक व शास्त्रज्ञ यांच्या मूळ आवाजातील भाषणांचे ध्वनिमुद्रण हे पुरातत्त्व वस्तुसंग्रहालयामधून, आर्काइव्हजमधून जपून ठेवले जाते. हे सर्व ध्वनिमुद्रित संग्रह समकालीन आधुनिक इतिहासाची महत्त्वपूर्ण संदर्भ साधने होत.

## २. दूरचित्रवाणी (टेलिव्हिजन)

टेलिव्हिजनने आधुनिक जगात विविध क्षेत्रांत क्रांती घडवून आणलेली आहे. जगाच्या पाठीवर कोणतीही घटना प्रत्यक्ष घडत असताना त्याची सचित्र माहिती आपणास आपल्या घरात टी.व्ही.च्या माध्यमातून दिसते. मग ती बातमी एखाद्या दहशतवादी कृत्याची, युद्धाची, आकाशात झेपावणाऱ्या क्षेपणास्त्राची असो. एवढे आधुनिक तंत्रज्ञान प्रगत झाले आहे. भारतात या दूरचित्रवाणीची सुरुवात इ. स. १९५९ मध्ये झाली. आकाशवाणी व दूरचित्रवाणी ही दोन्ही माध्यमे एकत्रित काम करत होती. १९७६ मध्ये दूरचित्रवाणी व आकाशवाणी असे दोन स्वतंत्र विभाग करण्यात आले. दूरचित्रवाणी हे प्रसारमाध्यम भारतातील ९० टक्के लोकांपर्यंत पोहोचले आहे. १९९० नंतर टी.व्ही.चा प्रसार झपाट्याने झाला. कारण या क्षेत्रात खाजगी दूरचित्रवाहिन्या, खाजगी टी.व्ही. चॅनल्स मोठ्या संख्येने उतरली. रंगीत टी.व्ही. संच, प्रत्यक्ष घडणाऱ्या घटना व बातम्यांचे प्रसारण, रिमोटचा वापर इत्यादींमुळे टी.व्ही.ची लोकप्रियता खूप वाढली. समकालीन ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय घडामोडींचे प्रत्यक्ष दर्शन घराघरापर्यंत पोहोचले. त्यातून ऐतिहासिक माहिती, ऐतिहासिक स्थळे व घटना यांचे प्रसारण होऊ लागले. उपग्रहांद्वारे वाहिन्यांचे प्रक्षेपण सुरू झाले. आज देश-विदेशांतील शेकडो वाहिन्या कार्यरत आहेत. दररोजच्या बातम्या, शिक्षण, आरोग्य, कृषी, क्रीडा, मनोरंजन इत्यादी क्षेत्रांतील माहिती दिली जाते. हे कार्यक्रम इंग्रजी, हिंदी व प्रादेशिक भाषेतून प्रसारित केले जातात. त्यामुळे लोकांचे प्रबोधन, मनोरंजन, लोकशिक्षण व लोकजागृती इत्यादी बाबी घडून येतात. दूरचित्रवाहिनीवरून प्रसारित होणारी ऐतिहासिक नाटके, ऐतिहासिक चित्रपट किंवा ऐतिहासिक मालिका त्यासंबंधीची वस्तुनिष्ठ माहिती त्या काळातील वेश व केशभूषा, अलंकार इत्यादी माहिती इतिहासतज्ज्ञांकडून घेतली जाते. ही ऐतिहासिक माहिती व ज्ञान इतिहासासाठी महत्त्वाची साधने आहेत.

Scanned by TapScanner

### ३. लघुपट (Short Films)

आपण आताच टेलिव्हिजनविषयीची थोडक्यात माहिती पाहिली. या टी.व्ही.वरूनच प्रेक्षणीय ऐतिहासिक स्थळे व स्मारके यांच्याविषयीची माहिती देणारे लघुपट बनवून दाखवले जातात. अशा प्रकारचे लघुपट, चलपट व चित्रपटांच्या निर्मिती व प्रसारणासाठी अभ्यासशाखा म्हणून अनेक संस्थांनी मान्यता दिली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या शोधामुळे चित्रपट व्यवसायाने सर्वांत मोठी आघाडी घेतली. इ. स. १८९९ मध्ये श्री. हरिश्चंद्र सखाराम भाटवडेकर उर्फ सावेदादा यांनी मुंबईतील आझाद मैदानावर पहिला लघुपट दाखविला. दादासाहेब फाळके यांनी 'राजा हरिश्चंद्र' हा पहिला चित्रपट दाखविला. त्यांना 'भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक' म्हणून संबोधले जाते.

दादासाहेब फाळकेंना आनंदराव मेस्त्री, बाबूराव पेंटर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. इ. स. १९६१ मध्ये मुंबई येथे इस्टमन कलर लॅब सुरू झाली. तेथून पुढे हिंदी व सर्व भारतीय प्रादेशिक भाषांत रंगीत चित्रपटांचे युग सुरू झाले. या चित्रपट युगाने १९८१ पर्यंत भारतीय समाजावर अधिराज्य केले म्हणूनच १९६१ ते १९८१ या काळास 'भारतीय सिनेमाचे सुवर्णयुग' म्हटले जाते. १९८२ नंतर टेलिव्हिजन व व्हिडिओ आल्यानंतर सिनेमा उद्योगास ओहोटी लागली. ५० ते ६० टक्के लोकांनी टी.व्ही.मुळे चित्रपट थिएटरकडे पाठ फिरवली. या काळात ऐतिहासिक लघुपट, लघु माहितीपट व चित्रपटांची निर्मिती झाली. उदा. छत्रपती शिवाजी महाराज, सम्राट अशोक, सम्राट अकबर, क्रांतिवीर भगतसिंग, महात्मा गांधी इत्यादी. या चित्रपटनिर्मितीत उणिवा राहू नयेत, त्रुटी राहू नयेत म्हणून तत्कालीन वेशभूषा, केशभूषा, वातावरणनिर्मिती, संवाद इत्यादींची माहिती इतिहासतज्ज्ञांकडून घेतली जाते. त्यामुळे ते एक ऐतिहासिक साधन तयार होते. याच्या प्रसारणामुळे विद्यार्थी व जिज्ञासू लोकांना इतिहास सहजपणे समजतो.

### ४. महाजाल (इंटरनेट) (Internet)

२१ वे शतक हे आय.टी. (Information Technology) चे युग म्हणून ओळखले जात आहे. इंटरनेटच्या माध्यमातून माहितीची अनेक साधने उपलब्ध होत आहेत. दिवसेंदिवस त्यात मोठ्या संख्येने भर पडत आहे. आय.टी.मुळे माहिती देणाऱ्या साधनांचा विस्फोट झाला आहे. सर्व जग हे एकत्र जोडले गेले आहे. म्हणूनच इंटरनेटला माहितीचे मायाजाल म्हटले जाते. कारण सर्व जगातील माहिती क्षणार्धात आपल्याला मिळते. इंटरनेटमुळे माहिती, मनोरंजन व संवाद यांची उपलब्धता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. इंटरनेट हा शब्द 'वर्ल्ड वाइड वेब' (www) म्हणून ओळखला जातो. आज संगणक

Scanned by TapScanner

लॅपटॉप, पामटॉप व आयपॅड या साधनांच्या मार्फत विविध प्रकारची माहितींची नोंद करणे व ती मिळविणे अत्यंत सुलभ झाले आहे.

इंटरनेटची सुरुवात अमेरिकेत २० व्या शतकाच्या शेवटी–शेवटी झाली. इंटरनेटचा वापर अमेरिकेत प्रथम संरक्षण क्षेत्रासाठी केला. त्यामुळे त्याची गुप्तता पाळण्यात आली. इ. स. १९६९ मध्ये अमेरिकेतील चार विद्यापीठे नेटवर्किंगने जोडली. त्यामुळे या प्रणालीचे ज्ञान जगभर पसरण्यास वेळ लागला नाही. आपल्या भारतात १९९५ मध्ये 'व्ही.एस.एन.एल' या कंपनीने पहिली इंटरनेट सेवा सुरू केली. आज २१ व्या शतकात शेकडो खाजगी संस्था इंटरनेटची सेवा पुरवत आहेत व प्रत्येक दिवशी त्यात भर पडत आहे. आज भारतात कोट्यवधी लोक या माध्यमांद्वारे परस्परांशी जोडले गेले आहेत.

**इंटरनेटची कार्यप्रणाली :** इंटरनेटच्या नेटवर्किंगमुळे आपण घरबसल्या आपला संगणक, लॅपटॉप, पामटॉप इत्यादींच्या पडद्यावर जगाच्या कानाकोपऱ्यात माहितींची देवाणघेवाण करू शकतो. जगभरातील ग्रंथालये, कारखाने, डॉक्टर्स, इंजिनिअर्स यांच्याकडून त्या–त्या क्षेत्रातील आवश्यक माहिती त्यांच्याशी थेट संपर्क साधून घेऊ शकतो. आपले नातेवाईक, मित्र–मैत्रिणी यांच्याशी सहज गप्पा मारू शकतो. इंटरनेटने आपणास पुढीलप्रमाणे सुविधा पुरविल्या आहेत.

**१. ई–मेल (ई–टपाल) :** ई–मेल ही इंटरनेटने दिलेली फार मोठी देणगी आहे. ई–मेल ही संदेश–टपालाचे वहन करणारी आधुनिक सेवा आहे. अनेक खाजगी संस्था त्यात काम करत आहेत. ई–मेलसाठी स्वत:चा व ज्याला मेल करावयाचा आहे त्याचा ई–मेल ॲड्रेस आवश्यक असतो. त्यानंतर संगणकप्रणाली तो मेल क्षणार्धात योग्य त्या पत्त्यावर पोहोचवते. या ई–मेलमुळे इतिहासाचे दस्तऐवज, मूळ साधने व त्यातील नोंदी, प्रतिमा, नकाशे इत्यादी फोटो स्कॅन करून पाठविणे सोपे झाले आहे. या सेवेमुळे क्षणार्धात टपाल पाठविता येते.

**२. वेब जर्नालिझम : (वेब पत्रकारिता) :** इंटरनेटच्या माध्यमातून जी पत्रकारिता केली जाते, त्यास वेब जर्नालिझम म्हणतात. यात वेब चॅनल्स, सोशल मीडिया, ट्विटर, फेसबुक, यू–ट्यूब इत्यादी वेब माध्यमांतून परस्पर सहकार्य करणारी पत्रकारिता केली जात आहे. भारतात विविध भाषांमध्ये वेब पत्रकारिता व सोशल मीडिया कार्यरत आहे.

**ई–वृत्तपत्र :** जगातील बहुसंख्य वृत्तपत्रे आज ई–स्वरूपात उपलब्ध करून दिली जात आहेत. मुद्रित माध्यमाबरोबर ई–सेवाही अधिक गतिमान झाली आहे. २१ व्या शतकात प्रसार माध्यमांमध्ये ई–वृत्तपत्रांना फार महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

Scanned by TapScanner

याशिवाय व्हिडिओ फोनद्वारा चित्र सेवा दिली जाते. त्यामुळे प्रत्यक्ष संवाद साधणे शक्य झाले आहे. संदेश पाठविण्यासाठी 'पेजर' सेवा दिली जाते. मुद्रित स्वरूपातील संदेश पाठविण्यासाठी 'फॅक्स' (Far away xerox) ची सेवा दिली जाते. आज आपल्या मोबाईलमध्येसुद्धा वरील सेवा उपलब्ध झालेल्या आहेत.

अशा प्रकारे आरोग्य, शिक्षण, व्यापार, अर्थकारण, राजकारण, समाजकारण, कृषी क्षेत्र यांत इंटरनेटचा मोठ्या प्रमाणात उपयोग करून घेतला जात आहे.

**इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे उपयोग**

१. ही माध्यमे मुद्रित माध्यमापेक्षा जास्त प्रभावी आहेत. कारण ती दृकश्राव्य साधने आहेत. यातून प्रभावी व परिणामकारक संदेश दिला जातो.

२. या माध्यमांमुळे जगाच्या कानाकोपऱ्यांतील सर्व प्रकारची माहिती क्षणार्धात मिळते.

३. ही माध्यमे माहिती व मनोरंजनाचे महत्त्वाचे साधन ठरले आहे.

४. शिक्षण, ज्ञान व विज्ञानाचा प्रसार गतीने सुरू झाला आहे.

५. या माध्यमांमुळे ऐतिहासिक साधनांचे जतन व संवर्धन करता येते.

६. या माध्यमांमुळे सर्व्हे, मुलाखत, प्रश्नावली, वृत्तपत्रे, रेडिओ, टी.व्ही.वरील भाषणे इत्यादींचे रेकॉर्डिंग करून घेता येते. या सर्वांचा महत्त्वाची ऐतिहासिक साधने म्हणून उपयोग होतो.

७. लक्षावधी कागदपत्रे व दस्तऐवज यांचे कायमचे जतन कमी जागेत करून ठेवता येते.

## विद्यापीठीय स्वरूपाचे प्रश्न

**प्रश्न १ : वस्तुनिष्ठ प्रश्न**

**प्रश्न : योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. संशोधकाने इतिहासलेखन करताना ........ सर्वेक्षण वापरावे.

*(अ) स्वतः केलेले* *(ब) दुसऱ्याने केलेले*

*(क) पूर्वी अस्तित्वात असलेले* *(ड) तौलनिक*

Scanned by TapScanner

२. मुलाखत घेण्याचे ठिकाण .......... सोईचे असावे.

*(अ) मुलाखत घेणाऱ्याच्या* *(ब) मुलाखत देणाऱ्याच्या*
*(क) मुलाखत ऐकणाऱ्याच्या* *(ड) मुलाखत बघणाऱ्याच्या*

३. ......... इतिहास संशोधनात प्रश्नावलीस महत्त्वपूर्ण स्थान आहे.

*(अ) प्राचीन* *(ब) मध्ययुगीन*
*(क) अर्वाचीन* *(ड) समकालीन*

४. कागदाचा शोध लागण्यापूर्वी ......... वृक्षाच्या सालीवर लिखाण करत.

*(अ) अशोक* *(ब) कदंब*
*(क) शाल* *(ड) साग*

५. भारताचे राष्ट्रीय पुराभिलेखागार ......... येथे आहे.

*(अ) मुंबई* *(ब) मद्रास*
*(क) कोलकता* *(ड) नवी दिल्ली*

६. इ. स. १८३२ मध्ये मुंबई येथे 'दर्पण' हे वृत्तपत्र ......... नी सुरू केले.

*(अ) आचार्य बाळशास्त्री जांभेकर* *(ब) लोकमान्य टिळक*
*(क) आचार्य जावडेकर* *(ड) लोकहितवादी*

७. गोपाळ गणेश आगरकर यांनी .......... वृत्तपत्र सुरू केले.

*(अ) केसरी* *(ब) मराठा*
*(क) सुधारक* *(ड) दर्पण*

८. आकाशवाणीला पूर्वी ........ असे म्हटले जाई.

*(अ) दूरध्वनी* *(ब) नभोवाणी*
*(क) प्रसारभारती* *(ड) युववाणी*

९. भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक ......... हे होत.

*(अ) आनंदराव मेस्त्री* *(ब) बापूराव पेंटर*
*(क) भालजी पेंढारकर* *(ड) दादासाहेब फाळके*

१०. मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र ......... आहे.

*(अ) समाचार दर्पण* *(ब) दर्पण*
*(क) केसरी* *(ड) सुधारक*



Scanned by TapScanner

प्रश्न २ : लघूत्तरी प्रश्न / टीपा लिहा / थोडक्यात उत्तरे लिहा.

(१) सर्वेक्षण
(२) मुलाखत
(३) प्रश्नावली
(४) पुराभिलेखागार
(५) वृत्तपत्रे
(६) आकाशवाणी
(७) दूरचित्रवाणी
(८) लघुपट
(९) इंटरनेट.

प्रश्न ३ : दीर्घोत्तरी प्रश्न

१. आधुनिक ऐतिहासिक साधने म्हणून सर्वेक्षण, मुलाखत व प्रश्नावली यांची माहिती द्या.

२. पुराभिलेखीय आणि वृत्तपत्रे या ऐतिहासिक साधनांची चर्चा करा.

३. आधुनिक इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा थोडक्यात आढावा घेऊन ती इतिहासलेखनास कशी उपयुक्त ठरतात ते सांगा.

❁❁❁

Scanned by TapScanner